


Subscribe इयत्ता – चौथी ( 5 जुलै ) माझा अभ्यास Subscribe

## शासनाच्या 45 दिवसाच्या ब्रीज कोर्ससोबत माझा अभ्यास PDF

**शासनाच्या ब्रीज कोर्ससोबत क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा अभ्यासक्रम समाविष्ट**

# दिवस पाचवा :






**ब्रीज कोर्ससोबत चालू इयत्तेचा नियमित अभ्यासक्रम समाविष्ट (वापरणे सक्ती नाही.)**

टेस्ट सोडवा

उतारा वाचा व समजून घ्या.

## २. बोलणारी नदी

एक होती मुलगी. तिचे नाव लीला. होती ती चौथीत अन् होती भारी खोडकर. लोकांना त्रास द्यावा असे तिला नाही वाटायचे, पण तिला खोड्या काढण्याची भारी हौस. स्वतःच्या मनात येईल ते करायची तिला इच्छा असायची. त्यासाठी मजेशीर युक्त्या शोधायची. तिचे घर होते गावाच्या एका टोकाला. तिच्या घराच्या मागील वावराच्या बाजूला थोडेसे चालत गेले की नदी होती.




एक दिवस लीलाला बर्फाचा गोळा खावासा वाटला. आई म्हणाली, ''नको खाऊ.'' ताई म्हणाली, ''नको खाऊ.'' माई म्हणजे तिची आजी म्हणाली,

*'' लीला गं लीला,*
*नको खाऊ गोळा,*
*दुखेल तुझा गळा.*
*सगळं पाणी होईल,*
*नाकात गोळा !''*


आता काय करावे बरे ? लीला विचार करू लागली. तिला एक युक्ती सुचली. ती नदीकडे गेली. नदीला म्हणाली, ''नदी गं नदी !'' पण नदी बोलणार कशी ? मग ती स्वतःच म्हणाली, ''बोल गं लीला.'' मग लीला म्हणाली, ''नदी गं नदी, लीलाला खायचाय बर्फाचा गोळा; पण माई म्हणाली, दुखेल गळा. खाऊ का नको ?'' पण नदी कशी बोलणार ? परत लीलाच म्हणाली, ''मग खा की. पळत जा अन् पटकन खा.'' लीला म्हणाली, ''अगं, पण तुझं कसं ऐकू ? ताई म्हणाली, नको खाऊ. आई म्हणाली, नको खाऊ. माई म्हणाली, नको खाऊ.'' पण नदी कशी बोलणार ? परत लीलाच म्हणाली, 'अगं, ताईपेक्षा मोठी आई. आईपेक्षा मोठी माई. पण माईपेक्षाही मोठी मी – नदीबाई. माझं ऐक.'' ''बरोब्बर !''

## कोनाचे प्रकार समजून घ्या.


- खालील आकृत्यांचे निरीक्षण करून आकृतीखालील चौकटींत काटकोन, लघुकोन किंवा विशालकोन असे लिहा.




- खाली दिलेले ठिपके जोडून काटकोन तयार करा.



- खाली दिलेले ठिपके जोडून लघुकोन तयार करा.



- खाली दिलेले ठिपके जोडून विशालकोन तयार करा.




- हाताच्या कोपराजवळ काटकोन, लघुकोन, विशालकोन करून एकमेकांनी केलेले कोन तपासा.
- पाहा बरे, असे आहे का ?
  - विजेच्या खांबाने जमिनीशी केलेला कोन काटकोन असतो.
  - घसरगुंडीने जमिनीशी केलेला एक कोन हा लघुकोन असतो आणि दुसरा कोन विशालकोन असतो.
  - शिडीने भिंतीशी केलेला एक कोन लघुकोन असतो व भिंतीशी केलेला दुसरा कोन विशालकोन असतो.
  - बाभळीच्या काट्यांमध्ये असणारा कोन विशालकोन असतो.
  - हाताचा अंगठा सोडून इतर लगतच्या दोन बोटांमधील कोन लघुकोन असतो.


**उपक्रम :** तुमच्या परिसरात कोठे कोठे कोन आढळतात ते पाहा. कागदाला घड्या घालून काटकोन, लघुकोन, विशालकोन तयार करा.

## Understand the angles.

- **Observe the figures below and write 'right angle', 'acute angle' or 'obtuse angle' in the box below each figure.**




- **Make right angles by joining the dots in the box below.**







- **Make acute angles by joining the dots.**



- **Make obtuse angles by joining the dots.**



- **Make a right angle, acute angle and obtuse angle at your elbow. Show these angles to your friends and check theirs.**
- **Check! Is this true?**
  - The angle an electric pole makes with the ground is a right angle.
  - The slide makes one acute angle and one obtuse angle with the ground.
  - The ladder makes one acute angle and one obtuse angle with the wall.
  - The angle between the thorns of the *babul* tree is an obtuse angle.
  - Leaving the thumb, the angles between any two adjoining fingers is an acute angle.

**Activity :** Observe in which places in your surroundings you find angles.
Make right angles, acute angles and obtuse angles by folding paper.



**2. Listen, learn and speak.**
ऐका, शिका आणि बोला.



टेस्ट सोडवा

**Teacher :** Now we will use these two circles to practise English dialogues, in five different pairs. Ready?



**Dialogue 1**

**A** : Hello.
**B** : Hello.
**A** : How are you ?
**B** : I'm fine. Thank you. How are you ?
**A** : Fine. Thanks.

**Dialogue 2**

**A** : What's your name ?
**B** : Ravi. Tell me your name, please.
**A** : Chandrashekhar. You can call me Chandu.

**Dialogue 3**

**A** : Where do you live ?
**B** : I live in Ambajogai.
**A** : Where in Ambajogai ?
**B** : Near Yogeshwari temple.
Behind the Tehsil office /
in Guruwar Peth /
on Mandi Bazar Road ...

**Dialogue 4**

**A** : Bye, bye.
Have a nice day.
**B** : Bye. See you.
Have a nice day.

मुलांनी दोन वर्तुळांत समोरासमोर उभे राहून पूर्ण संवाद करावा. नंतर एका वर्तुळातील मुलांनी पुढील जोडीदाराकडे जावे आणि पुन्हा त्याच संवादाचा सराव करावा. पूर्ण वर्तुळ फिरेपर्यंत असे करावे. निळ्या चौकटीतील शब्दांऐवजी मुलांनी स्वत:ची माहिती द्यावी.

## १. प्राण्यांचा जीवनक्रम


टेस्ट सोडवा

वाचा व समजून घ्या.

असते. आता जुन्या कातीतून सुरवंट बाहेर पडतो. त्याला सुरवंटाचे कात टाकणे म्हणतात.

पुन्हा तो वेगाने पान कुरतडून खायला सुरुवात करतो. पुन्हा त्याची झपाट्याने वाढ होते. दोन ते अडीच दिवसांनी तो परत कात टाकतो.

अशा रीतीने तो चार वेळा कात टाकतो. बिबळ्या कडवा प्रकारचे फुलपाखरू सुरवंट अवस्थेत दहा ते बारा दिवस असते.



कोशावस्था

पाचव्या वेळी वाढ पूर्ण झाली, की सुरवंट आपल्या खालच्या ओठातून एक प्रकारचा रेशमासारखा लांबलचक धागा काढतो. स्वतःभोवती तो धागा लपेटून घेत घेत छोटेसे आवरण तयार करतो. त्या आवरणाला कोश म्हणतात. वाढीच्या या अवस्थेला कोशावस्था म्हणतात.

कोशाच्या आत बिबळ्या कडवा अकरा किंवा बारा दिवस असतो. या अवस्थेत तो काहीही खात नाही. पण त्याने स्वतःभोवती निर्माण केलेल्या आवरणाच्या आत त्याच्या शरीरात महत्त्वाचे बदल घडून येत असतात. पायांची लांबी वाढते. आकर्षक पंख निर्माण होतात. हे त्यांपैकी काही बदल आहेत

आवरणाच्या आत बिबळ्या कडव्याची वाढ पूर्ण होते. नंतर प्रौढ अवस्थेतले फुलपाखरू कोशाच्या आवरणातून बाहेर येते. सर्व फुलपाखरांची वाढ याच पद्धतीने होते.



कोशातून फुलपाखरू बाहेर येताना



बिबळ्या कडवा फुलपाखरु

### माहीत आहे का तुम्हांला

प्रत्येक प्रकारच्या फुलपाखराची मादी कोणत्या प्रकारच्या वनस्पतीच्या पानांवर अंडी घालणार हे ठरलेले असते.

निरनिराळ्या प्रकारच्या फुलपाखरांमध्ये अंड्यामधून सुरवंट बाहेर येण्याचा काळ कमी–जास्त असतो.

सुरवंटांमध्ये खूप विविधता असते. निरनिराळ्या प्रकारचे सुरवंट निरनिराळ्या रंगांचे असतात. त्यांचे शरीर लांबुळके असते. अनेक सुरवंटांच्या अंगावर केसासारखे तंतू असतात.

सराव करा.

# १. शिवजन्मापूर्वीचा महाराष्ट्र

टेस्ट सोडवा

## स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी कंसातील योग्य पर्याय लिहा.**

(अ) शिवाजी महाराज ज्या काळात होऊन गेले तो काळ ............ युगाचा होता.

(प्राचीन, मध्य, आधुनिक)

(आ) शिवाजी महाराजांनी ............... स्वराज्य निर्माण केले.

(महाराष्ट्रात, मध्यप्रदेशात, उत्तर प्रदेशात)

**२. 'अ' गट व 'ब' गट यांच्या जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (अ) विजयनगरचा सम्राट | (१) निजामशाहा |
| (आ) अहमदनगरचा सुलतान | (२) आदिलशाहा |
| (इ) विजापूरचा सुलतान | (३) कृष्णदेवराय |
| | (४) सम्राट अकबर |

**३. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) प्रजेच्या कल्याणासाठी राज्य करणाऱ्या राजांची नावे लिहा.

(आ) शिवाजी महाराजांनी कोणते कार्य हाती घेतले?

(इ) शिवाजी महाराजांनी कोणाशी झुंज दिली ?

**४. वेगळा शब्द ओळखा.**

(अ) स्वराज्य, गुलामगिरी, स्वातंत्र्य.

(आ) रयत, प्रजा, राजा.

**उपक्रम**

(अ) तुमच्या वर्गात शिवजयंती साजरी करा.

(आ) शाळेच्या सांस्कृतिक कार्यक्रमात ऐतिहासिक गीते, पोवाडे यांचे सादरीकरण करा.

CJY07P



# माझा ऑनलाईन अभ्यास

## स्वयंमूल्यमापन चाचणी पहा खालील लिंकवर..

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## माझा ऑनलाईन अभ्यास – प्रत्येक घटकाच्या टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन

| चौथी मराठी | चौथी गणित | सेमी गणित | चौथी इंग्रजी | चौथी प.अ-1 | चौथी प.अ-2 |
|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## दररोजच्या माझा अभ्यास pdf तुम्हाला खालील लिंकवर मिळतील.

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## इतर इयत्तांच्या ऑनलाईन टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन...

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## MiniShala शैक्षणिक ॲप्स खालील लिंकवरुन डाऊनलोड करा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
| | | आठवी | नववी | दहावी | | |

गुरुमाऊली शैक्षणिक ॲप्स – Click Here

निर्मिती - श्री.प्रविण डाकरे, श्री.जयदिप डाकरे वेब स्त्रोत-'ई-बालभारती' सौजन्य- जिल्हा परिषद कोल्हापूर

https://www.gurumauli.in